महाराष्ट्र शासन

# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

राज्य आरोग्य सोसायटी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कार्यालय

आरोग्य भवन, ३ रा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२-२२७१ ७५०० | ईमेल : mdnrhm.mumbai@gmail.com | www.nrhm.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

क्रमांक : राआसोम/कोरोना विषाणू/मार्ग सुचना/~~११५२३४~~ ११५२१२/२०२०

दिनांक : ६ मार्च, २०२०

प्रति,

- जिल्हाधिकारी (सर्व)
- आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

**विषयः- कोरोना विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने करावयाची उपाययोजना**

देशाच्या काही भागामध्ये सध्या चीन देशामधून प्रसारीत झालेल्या कोरोना विषाणूचा संसर्ग झालेचे आढळुन आलेले आहे. सध्या महाराष्ट्र राज्यात आतापर्यत एकही रुग्ण आढळुन आलेला नाहीत. अद्यापपर्यत भारतात अशा प्रकारचा रुग्ण येऊ नये तसेच दुर्देवाने रुग्ण आढळुन आल्यास त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे मार्गदशक सूचना देण्यात येत आहेत.

१) जनजागृती - या आजाराविषयी लोकांच्या मनात भिती व गैरसमज मोठया प्रमाणात आढळुन येत आहे. त्यामुळे या आजाराविषयी शासनाच्या आरोग्य विभागातर्फे माहिती देणारे आरोग्य शिक्षण साहित्य यामध्ये पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग, रेडिओ जिंगल्स्, माहिती पुस्तिका इ. चा समावेश आहे. या सर्व साहित्याचा वापर आपल्या कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणावर करण्यात यावा व लोकांमधील भिती व संभ्रम दूर होईल हे पहावे.

२) महाराष्ट्र राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर या विमानतळावर परदेशातून आलेल्या प्रवाशांची तपासणी करण्यात येत आहे. या तपासणीमध्ये कोरोना सदृश्य लक्षणे आढळुन आलेल्या प्रवाशांना शासकीय रुग्णालयात आयसोलेशन वॉर्डात दाखल करणे आवश्यक आहे. या ठिकाणी वैद्यकीय तपासणी तसेच घशातील नमुना (Throt Swab) घेण्यात येऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात यावा.

३) बाधित देशामधून आलेल्या पंरतु लक्षणे नसलेल्या प्रवाशांचा दूरध्वनीव्दारे १४ दिवसापर्यंत पाठपुरावा करण्यात यावा.

४) आपल्या जिल्हयातील जिल्हा रुग्णालय तसेच वैद्यकीय महाविद्यालयामध्ये आयसोलेशन वॉर्ड करण्यात आलेबाबत खात्री करावी तसेच त्या ठिकाणी गंभीर रुग्ण दाखल झाल्यास अशा गंभीर रुग्णासाठी व्हेन्टीलेटर व इतर सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करावी.

५) आपल्या कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालयामध्ये सुध्दा आयसोलेशन वॉर्ड सुरु करणे आवश्यक आहे. त्यांचेसाठी चेकलिस्ट तयार करण्यात आलेली असुन या चेकलिस्ट नुसार खाजगी रुग्णालयातील आयसोलेशन वॉर्ड तयार ठेवावेत.



Scanned by CamScanner

६) बाधीत देशातून आलेल्या ज्या प्रवाशांमध्ये लक्षणे आढळुन येतील अशा रुग्णांचा Throt Swab negative आल्यानंतर १४ दिवस पाठपुरावा करणे आवश्यक आहे. यादृष्टीने रुग्णालयातून डिसचार्ज झालेल्या रुग्णांचा दूरध्वनीव्दारे पाठपुरावा आरोग्य यंत्रणेमार्फत करण्यात यावा.

७) एन-९५ मास्क तसेच सर्जीकल मास्क याचा अनावश्यक वापर जनतेकडुन होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने शास्त्रीय माहिती लोकापर्यत पोहोचणे आवश्यक आहे. तसेच खाजगी औषध व्यावसायिकाकडुन या साहित्याची विक्री जास्त किमतीने करणे वा त्यांचा तुटवडा निर्माण होणे यावर आपल्या स्तरावर नियंत्रण ठेवण्यात यावे.

८) कार्यक्षेत्रातील हॉटेलमध्ये बाधीत देशातून आलेले प्रवाशी वास्तव्य करतात. अशा प्रवाशामध्ये लक्षणे आढळल्यास त्यांना शासकीय रुग्णालयामध्ये संदर्भीत करणे व ते ज्या ठिकाणी वास्तव्य केले त्या कार्यक्षेत्रामध्ये निर्जुंतूकीकरण करण्याच्या दृष्टीने काळजी घेणे आवश्यक आहे. याबाबतच्या सूचना हॉटेल व्यावसायिकांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात तसेच याविषयीच्या तांत्रिक मार्गदर्शक सूचना सर्व जिल्हा शल्य चिकित्सक यांना देण्यात आलेल्या आहेत.

९) जिल्हयातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांची बैठक बोलावून त्यांना या आजाराबाबत माहिती देणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच संशयित रुग्णांच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही व आयसोलेशन वॉर्ड तयार करणे याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

१०) आपल्या अध्यक्षतेखाली आयडीएसपी कार्यक्रमांतर्गत समितीची स्थापना करण्यात आलेली असुन या समितीची बैठक वारंवार आयोजित करावी व यामध्ये संपूर्ण परिस्थितीचा नियमितपणे आढावा घेण्यात यावा.

११) सार्वजनिक ठिकाणी मोठे समारंभ / कार्यक्रम शक्यतो टाळावेत.

याबाबतच्या केंद्र शासनाच्या निर्गमित केलेल्या सर्व सूचना तसेच जागतिक आरोग्य संघटनेने तयार केलेल्या तांत्रिक मार्गदर्शक सूचना सर्व जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना यापूर्वीची देण्यात आलेल्या आहेत. आपल्या स्तरावर या अनुषंगाने याबाबतचा नियमितपणे आढावा घ्यावा.

सोबत : केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना दिनांक ०५/०३/२०२०

**आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई**

प्रत सादर
मा.प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई

प्रत माहितीस्तव : संचालक,आरोग्य सेवा,पुणे /मुंबई

Scanned by CamScanner